**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI.**

**DIRECTION**

**No. : 29 / 2012** **Dated : 5 - 7 – 2012**

**Subject : Enhancement in the Age of Superannuation of Principals / Teachers / Physical Education Persons working in Higher and Technical Education field.**

Whereas, the Government of India in Ministry of Human Resource Development Department of Higher Education, New Delhi, has issued a letter No. 1-32/2006-U.II/U.I(i) dated 31st December, 2008, regarding Scheme of revision of pay of teachers and equivalent cadres in universities and colleges following the revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission, for revision of pay scales of teachers and equivalent cadres in the Central Universities.

AND

Whereas, Government of India has mentioned in the above letter dated 31st December, 2008 that the scheme may be extended to Universities, colleges and other higher educational institutions coming under the purview of State Legislatures, provided State Governments wish to adopt and implement the scheme.

AND

Whereas, the Government of Maharashtra in Higher & Technical Education Department, Mumbai, has issued Government Resolution No. NGC 2009/(243/09)-UNI-1, dated 12th August, 2009, regarding Revision of Pay Scales of teachers and equivalent cadres in Higher Education as per UGC Scheme ( 6th Pay Commission), for teachers and other equivalent cadres of library and physical education in all the Universities, Colleges and other higher educational institutes coming under the purview of state legislature through the department of Higher and Technical Education of Maharashtra and governed by the rules of University Grants Commission.

AND

Whereas, the above Govt. Resolution dated 12th August, 2009, of Higher & Technical Education Department, Mumbai, is implemented, vide Direction No. 21 / 2009, dated 17-9-2009, by this university.

AND

Whereas, it is mentioned in the above Government Resolution dated 12th August, 2009 at para 1.2 that the Government after considering all the aspects has decided to revise pay scales and the dearness allowance of all teachers and equivalent cadres w.e.f. 01/01/2006 as per the Central Government (UGC) scheme while other allowances as per the State Government employees; to keep the age of superannuation and leave package unchanged and to take all necessary steps for improving the quality of education for meeting the requirements of the globalised economy and serious concerns expressed by the Hon. High Courts with regards to the poor quality and low employability of education.

AND

Whereas, the Government of Maharashtra in Higher & Technical Education Department, Mumbai, has issued Government Resolution No. SPC-2010 /(34/10)/TE-2, dated 20th August, 2010, regarding Revision of Pay Scales of Teachers and equivalent cadre in Degree / Diploma Level Technical Education as per AICTE Scheme (6th Pay Commission).......Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonare, University Departments, All University Affiliated Government and Non Government Aided Colleges & MSBTE affiliated Government and NON Government Aided Polytechnics conducting Professional Degree / Diploma Courses such as Engineering, Pharmacy, Architecture, Management etc.

Contd...

AND

Whereas, following para is mentioned under the heading 'RESOLUTION' in Government Resolution dated 20th August, 2010.

"The Government after considering all the aspects of the scheme announced by the All India Council for Technical Education vide its notification in reference 3 & 4, has decided to revise pay scales and Dearness Allowance of all teachers and equivalent cadres working in Government and non-Government aided institutions w.e.f. 01-01-2006 as per the provision of the scheme with additional provisions prescribed in para-8 of this resolution for enhancing and improving the quality of education. The other allowances applicable, the age of Superannuation and leave package to the teachers and librarians in these institutions shall be as per the State Government Employees."

AND

Whereas, the above Govt. Resolution dated 20th August, 2010, of Higher & Technical Education Department, Mumbai, is implemented, vide Direction No. 63/2010, dated 20-10-2010, by this university.

AND

Whereas, Government of Maharashtra in Higher and Technical Education Department issued Government Resolution No. Sankirna-2010/(503/10)Vishi-1, dated 5th March, 2011, for Enhancement in the Age of Superannuation of Principals / Teachers working in the State in Higher and Technical Education field, as recommended by UGC and AICTE.

AND

Whereas, the above Govt. Resolution dated 5th March, 2011, of Higher & Technical Education Department, Mumbai, is implemented, vide Direction No. 38/2011, dated 11-8-2011, by this university.

AND

Whereas, Government of Maharashtra in Higher and Technical Education Department & Director of Education (Higher Education), Pune issued following Government Resolutions, Govt. Corrigendum & Govt. Letter, regarding Enhancement in the Age of Superannuation of Principals / Teachers / Physical Education Persons working in the State in Higher and Technical Education field, as recommended by UGC and AICTE.

(1) Government Resolution No. Sankirna-2011/(396/11)Vishi-1, dated 23rd Nov., 2011.
(2) Government Resolution No. Sankirna-2011/(396/11)Vishi-1, dated 1st Dec., 2011.
(3) Letter No. UNI/Wayomaryada Wadh/Navi/Vishi-1, dated 30th Dec., 2011, issued by Director of Education (Higher Education), Pune.
(4) Govt. Corrigendum No. Sankirna-2011/(396/11)Vishi-1, dated 23rd Feb., 2012.
(5) Government Resolution No. Sankirna-2011/(370/11)Vishi-1, dated 28th Mar., 2012, regarding Enhancement in the Age of Superannuation of Director/Deputy Director/ Assistant Director of Physical Education (Posts equivalent to Teachers) working in Non Agricultural Universities & Affiliated Aided Non Government Colleges.

AND

Whereas, the University has to initiate action to frame suitable Statute, under the provisions of Section 51 of the Maharashtra Universities Act, 1994, to implement the Scheme of Enhancement in the Age of Superannuation of Principals / Teachers / Physical Education Persons working in the State in Higher and Technical Education field.

AND

Whereas, the matter is of urgent nature and framing of Statute is likely to take some time, it is necessary to issue direction in this regard.

Contd...

Therefore, to give immediate effect to the provisions contained in the above mentioned Government Resolutions (1) dated 5th March, 2011, (2) dated 23rd Nov., 2011, (3) dated 1st Dec., 2011, (4) dated 28th Mar., 2012 & Govt. Corrigendum dated 23rd Feb., 2012 and Letter dated 30th Dec., 2011 of Director of Education (Higher Education), Pune, I, Dr. Mohan Khedkar, Vice-Chancellor of Sant Gadge Baba Amravati University, under powers vested in me vide Section 14(8) of the Maharashtra Universities Act, 1994, hereby issue the following directions.

1. This direction shall be known as 'Enhancement in the Age of Superannuation of Principals / Teachers / Physical Education Persons working in Higher and Technical Education field, Direction, 2012.'

2. This direction shall come into force from the date of its issuance.

3. The Direction No. 38 / 2011, dated 11-8-2011, is hereby stands repealed.

4. Following Government Resolutions, Govt. Corrigendum & Govt. Letter are implemented by this Direction and are enclosed herewith as under......

(a) Government Resolution, No. Sankirna-2010/(503/10)Vishi-1, dated 5th March, 2011, of Higher and Technical Education Department, Mumbai, is enclosed herewith as **Annexure-A.**

(b) Government Resolution No. Sankirna-2011/(396/11)Vishi-1, dated 23rd Nov., 2011, Government Resolution No. Sankirna-2011/(396/11)Vishi-1, dated 1st Dec., 2011 & Govt. Corrigendum No. Sankirna-2011/(396/11)Vishi-1, dated 23rd Feb., 2012 of Higher and Technical Education Department, Mumbai and Letter No. UNI/Wayomaryada Wadh/Navi/Vishi-1, 30th Dec., 2011 of Director of Education (Higher Education), Pune are enclosed herewith as **Annexure-B.**

(c) Government Resolution, No. Sankirna-2011/(370/11)Vishi-1, dated 28th Mar., 2012, of Higher and Technical Education Department, Mumbai, is enclosed herewith as **Annexure-C.**

**Date :** 5 - 7 – 2012.
**Place :** Amravati.

**Sd/-**
**(Dr. Mohan Khedkar)**
**Vice-Chancellor**

* * * * * * *

# Annexure - A

**विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/(५०३/१०)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ५ मार्च, २०११

वाचा:
१) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-यू.II/यू.I(i) दिनांक ३१ डिसेंबर, २००८
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.
३) केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.एफ.१-७/२०१०-यू.II, दिनांक ११ मे, २०१०.
४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम २०१०, क्र.एफ.३-१/२००९, दिनांक ३० जून, २०१०
५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र. ३७-३/लिगल/२०१०, दि. ५ मार्च २०१० (पदवी)
६) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र. ३७-३/लिगल/२०१०, दि. ५ मार्च २०१० (पदविका)
७) शासन निर्णय क्र. एस.पी.सी.-२०१०/(३४/१०)/ तां.शि.-२, दि. २० ऑगस्ट २०१०
८) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.२५ फेब्रुवारी, २०११.

**प्रस्तावना :** राज्यातील अकृषि विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, तंत्रशास्त्र विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित पदविका संस्थातील शिक्षकांच्या विविध सेवाविषयक बाबींसंदर्भात वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून नियम, विनियम विहित करण्यात येतात.

२. अकृषि विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये शिकविण्यासाठी पात्र व अनुभवी अध्यापकांची कमतरता असल्याकारणाने व परिणामी रिक्त जागांचे प्रमाण वाढल्यामुळे केंद्र शासनाने दि.२३-३-२००७ च्या आदेशान्वये केंद्रीय शैक्षणिक संस्थेमधील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे केले आहे. तसेच रिक्त पदांची परिस्थिती व अध्यापकांची शारिरिक क्षमता विचारात घेऊन ६५ वर्षाच्या पुढे ५ वर्षापर्यंत पुनर्नियुक्ती करण्याचाही निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. याबाबत मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दि.३१-१२-२००८ च्या पत्रामध्ये स्पष्ट केले आहे.

३. राज्यातील अकृषि विद्यापीठे व शासकीय/अशासकीय महाविद्यालये/तंत्रनिकेतने (अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित) या शैक्षणिक संस्थांमध्ये सुध्दा सद्यःस्थितीत अध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणावर (सुमारे १७०००) रिक्त आहेत. अनुभवी व पात्र अध्यापकांची कमतरता असल्यामुळे उक्त परिस्थिती निर्माण झालेली आहे.

४. सध्या, राज्यात उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आणि शासकीय महाविद्यालयातील अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे निर्धारीत केले आहे.

५ तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थातील अध्यापकांना शासनाच्या अनुक्रमे दि. १८. १२ १९९९ व दि. २७.२.२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारसीनुरुप पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन श्रेण्या लागू करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतूदी नुसार पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्था वगळता इतरत्र सर्व संस्थात अध्यापकांचे सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्षे निर्धारीत करण्यात आले आहे. मात्र पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थातील अध्यापकांचे सेवा निवृत्तीचे वय ६० वर्षे निर्धारीत आहे. दि.२७.२.२००३ रोजीचा शासन निर्णय लागू होण्यापुर्वी अशासकीय अनुदानित पदवी संस्थासह पदविका संस्थातील अध्यापकांचेही सेवा निवृत्तीचे वय ६० वर्षे होते. परंतु सर्व शासकीय संस्थात अध्यापकांचे सेवा निवृत्तीचे वय सुरुवाती पासूनच ५८ वर्षे आहे.

६. उपरोक्त विवरणावरुन हे स्पष्ट होते कीं, राज्यात कार्यरत विविध शैक्षणिक संस्थांतील शिक्षकीय पदांचे सेवा निवृत्तीचे वय एकसमान नसून काही ठिकाणी ते ६० वर्षे व काही ठिकाणी ५८ वर्षे असे आहे. देशांतर्गत उच्च शिक्षण व तंत्रशिक्षणात कार्यरत पदवी व पदविका संस्थातील शिक्षकीय पदांच्या सेवाशर्ती व वेतनश्रेण्या विद्यापीठ अनुदान आयोग तथा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेद्वारे निर्धारीत केल्या जातात व या सेवाशर्ती तथा वेतनश्रेण्या जशाच्या तशा लागू करणे बंधनकारक असूनही राज्यात तशी कार्यवाही झाली नसल्याने वेतन खर्चापोटी केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानासाठी अपात्र होणे, विविध शैक्षणिक संस्थात शिक्षकीय पदे रिक्त रहाणे व यामुळे शैक्षणिक संस्थाच्या प्रवेश क्षमतेत केंद्र शासनाद्वारा घट करणे तथा शैक्षणिक संस्थेच्या कार्यक्षमतेवर विपरीत परीणाम होणे इत्यादी बाबी उद्‌भवत आहेत. सद्य:स्थिती विचारात घेऊन उच्च शिक्षण व तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत विविध अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, तंत्रशास्त्र विद्यापीठ तथा पदवी व पदविका संस्थातील शिक्षकीय पदांच्या सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

७. केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन संरचना लागू करण्या संदर्भात प्राप्त झालेल्या शिफारशी, तथा विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील अभ्यासक्रम राबविणारी अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ, अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित तंत्र निकेतनातील अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय निर्धारीत केल्याचे निकष व अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करुन संदर्भाधीन क्र.८ येथील दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन यासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे :-

## शासन निर्णय

८. १) राज्यांतर्गत कार्यरत अकृषी विद्यापिठांशी संलग्नित शासकीय महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र निकेतनातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६५ वर्षे करण्यात येत आहे.

परंतु, वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

२) राज्यांतर्गत कार्यरत अकृषी विद्यापिठांशी संलग्नित अशासकीय (अनुदानित/विनाअनुदानित) महाविद्यालयातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु, वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

३) राज्यांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

४) राज्यांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय विना अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

५) राज्यांतर्गत कार्यरत अकृषी विद्यापिठांशी संलग्नित शासकीय महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र निकेतनातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु, वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना कमाल ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

६) राज्यांतर्गत कार्यरत अकृषी विद्यापिठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील (अनुदानित/विना अनुदानित) प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु, वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार संबंधित अध्यापकांना ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

७) राज्यांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

(4)

८) राज्यांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय विना अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु, वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

९) अध्यापक व प्राचार्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि राज्यशासनाने वेळोवेळी विहीत केलेली पात्रता, अर्हता इत्यादी बाबी लागू राहतील.

१०) सदर निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे.

९. अकृषि विद्यापीठाशी संलग्नित/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय (कायम विना अनुदानित) शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक/प्राचार्य यांना मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय संबंधित संस्थेने त्यांच्या स्तरावर घ्यावा.

१०. वर नमूद केल्याप्रमाणे अध्यापक यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० वरुन ६२ पर्यंत व प्राचार्य यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरुन ६५ वर्षे करण्याकरिता आढावा घेण्यासाठी निम्न निर्देशित केल्याप्रमाणे आढावा समिती (Performance Review Committee) घटीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) सचिव / प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | अध्यक्ष |
| २) संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण | उपाध्यक्ष |
| ३) संबंधीत अकृषि विद्यापीठाचे कुलसचिव (पदवी /पदव्युत्तर संस्थांसाठी) | सदस्य |
| ४) संचालक, म.रा. तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ (पदविका संस्थांसाठी) | सदस्य |
| ५) संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण | सदस्य |
| ६) संबंधित सहसचिव / उपसचिव, विद्यापीठ शिक्षण/ तंत्र शिक्षण | सदस्य सचिव |

११. वरील सर्व संस्थांतील अध्यापक तथा प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देतांना संबंधितांनी निम्न बाबींची पुर्तता करणे अनिवार्य राहील. -

१) सदर संस्थांमधील अध्यापक / प्राचार्य यांच्या प्रथम नियुक्त्या विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने विहीत केलेल्या पात्रता, अटी व शर्ती प्रमाणे झालेल्या असणे आवश्यक आहे.

२) संबंधीत अध्यापक / प्राचार्य यांची शारिरिक व मानसिक क्षमता सुदृढ असणे आवश्यक असून त्याबाबत तज्ञ वैद्यकीय समितीचे (Govt. Medical Committee) प्रमाणपत्र संबंधित व्यक्तीने सेवानिवृत्तीपूर्वी तीन महिना अगोदर संबंधित संस्थेकडे सादर करणे आवश्यक राहील.

३) संबंधीत अध्यापक / प्राचार्यांनी Ph.D अथवा विद्यापीठ अनुदान आयोग तथा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषानुसार Ph. D शी समकक्ष अशी शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

४) संबंधीत अध्यापक / प्राचार्य यांच्या मुदतवाढीच्या दिनांकापूर्वीचे मागील पाच वर्षातील वार्षिक गोपनीय अहवाल विचारात घेऊन, सदर गोपनीय अहवालाची सर्वसाधारण मूल्यमापनाची प्रतवारी किमान तीन वर्षे उत्कृष्ट (A) आणि दोन वर्षे निश्चित चांगला (B+) असणे आवश्यक आहे.

५) शासकीय संस्था व्यतिरीक्त उर्वरीत संस्थांमधील कार्यरत असलेल्या **प्राचार्यांना ६२ वर्षानंतर** सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापूर्वी संस्थेने सदर रिक्त पद भरण्यासाठी वृत्तपत्रात किमान दोन

वेळा जाहिरात देऊन पद भरण्याचे प्रयत्न केलेले असावेत. प्राचार्यांना ६२ वर्षे वरुन ६५ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव किमान दोन वर्षानंतर उक्त समितीच्या निर्णयार्थ सादर होणार आहेत. त्यामुळे शैक्षणिक संस्थांमधील प्राचार्यांचे वयोमान ६१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थेने पुढील एक वर्षामध्ये सदर रिक्त होणारे पद भरण्यासाठी वर आदेशित केल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण करणे अनिवार्य राहील.

१२. या संदर्भात वरील सर्व नमूद संस्थांमधील अध्यापक / प्राचार्य यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने परिच्छेद-११ मधील निकष विचारात घेऊन निम्न नमूद उपसमितीच्या शिफारसीसह संबंधित विभागीय सहसंचालकांनी संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण यांच्या मार्फत योग्य प्रस्ताव सेवा निवृत्तीसाठी मुदत वाढ देण्याच्या दिनांकापुर्वी किमान १ महिना अगोदर संबंधित संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत अकृषी विद्यापीठे व संस्थांची राहील.

**अ. पदवी/पदव्युत्तर संस्थांसाठी छाननी समिती-**

| | |
|---|---|
| १) विभागीय सहसंचालक, उच्च/ तंत्र शिक्षण | अध्यक्ष |
| २) अकृषी विद्यापीठाचे कुलसचिव (पदवी/पदव्युत्तर संस्थांसाठी) | उपाध्यक्ष |
| ३) संबंधीत संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) प्रशासकीय अधिकारी, विभागीय सह संचालक कार्यालय | सदस्य सचिव |

**ब. पदविका संस्थांसाठी छाननी समिती-**

| | |
|---|---|
| १) विभागीय सहसंचालक, उच्च/ तंत्र शिक्षण | अध्यक्ष |
| २) विभागीय उपसचिव, म.रा.तं.शि. मंडळ | उपाध्यक्ष |
| ३) संबंधीत संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) प्रशासकीय अधिकारी , विभागीय सह संचालक कार्यालय | सदस्य सचिव |

१३. जे अध्यापक सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वीच्या निकषा नुसार दि. २८ फेब्रुवारी २०११ रोजी सेवानिवृत्त होणार असतील त्यांच्याबाबत उक्त परिच्छेद क्र.१२ मध्ये नमूद छाननी समितीचे अहवाल संबंधित संचालनालयामार्फत शासनास पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधितांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी सादर करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय सहसंचालक, अकृषी विद्यापीठे व संस्थांची असेल.

१४. सदर शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहील.

१५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. १२/११/सेवा-४, दिनांक १४.१.२०११ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीने निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत क्रमांक २०११०३०५१९२१०४००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

स्वाक्षरी/-

**( रा. गो. जाधव )**

**शासनाचे उपसचिव**

प्रति,

१ मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई

(6)

२ मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
५. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
६. संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई (५ प्रती)
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र मुंबई (५ प्रती )
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र , नागपूर (५ प्रती)
११. महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र नागपूर (५ प्रती )
१२. संचालक, व लेखा व कोषागारे , (५ प्रती)
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी
१६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्रशिक्षण
१७. मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रीशक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१९. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई
२०. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. वित्त विभाग, (सेवा-४ / सेवा-९ /कोषा-५ /व्यय-५) मंत्रालय, मुंबई
२२. नियोजन विभाग (कार्यासन १४७१)
२३. सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहायक,
२४. निवड नस्ती

# Annexure – B

**विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/(३९६/११)विशि-१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : २३ नोव्हेंबर, २०११.

वाचा: १) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-यू.II/यू.I(i) दि.३१ डिसेंबर, २००८
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.
३) केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.एफ.१-७/२०१०-यू.II, दिनांक ११ मे, २०१०.
४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम २०१०, क्र.एफ.३-१/२००९, दिनांक ३० जून, २०१०
५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र. ३७-३/लिगल/२०१०, दि. ५ मार्च २०१० (पदवी)
६) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र.३७-३/लिगल/२०१०, दि.५ मार्च २०१० (पदविका)
७) शासन निर्णय क्र. एस.पी.सी.-२०१०/(३४/१०)/ तां.शि.-२, दि. २० ऑगस्ट २०१०
८) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.२५ फेब्रुवारी, २०११.
९) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.५ मार्च, २०११.

**शासन निर्णय**

केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन संरचना लागू करण्या संदर्भात प्राप्त झालेल्या शिफारशी, तथा विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील अभ्यासक्रम राबविणारी अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ, अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित तंत्र निकेतनातील अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय निर्धारीत केल्याचे निकष व अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करुन संदर्भाधीन क्र.९ येथील दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापक व प्राचार्य पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

२. उक्त दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयाविरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. २०९३/२०११, ३१९७/२०११, ३४६३/२०११, ६२६२/२०११, ७१४३/२०११, ७७५६/२०११, ९५१/२०११, ९५३/२०११ याचिका लॉजिंग क्र.१४०९/२०११, १४२६/२०११ व १४९७/२०११ दाखल झाल्या होत्या. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि.३० सप्टेंबर, २०११ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन संदर्भाधीन दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १० व परिच्छेद १२ मधील तिन्ही समित्या रद्द करण्यात येत असून अध्यापक यांच्या

नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० वरुन ६२ पर्यंत व प्राचार्य यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरुन ६५ वर्षे करण्याकरिता आढावा घेण्यासाठी निम्न निर्देशित केल्याप्रमाणे आढावा समिती (Performance Review Committee) घटीत करण्यात येत आहे :-

**अ) प्राचार्य पदासाठी आढावा समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु / प्रकुलगुरु | - | अध्यक्ष |
| २) संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण | - | सदस्य |
| ३) संबंधित विद्यापीठातील ज्येष्ठतम प्राध्यापक | - | सदस्य |
| ४) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ५) संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव | - | सदस्य सचिव |

**ब) अकृषि विद्यापीठातील अध्यापक पदासाठी आढावा समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु, | - | अध्यक्ष |
| २) संबंधित विद्यापीठाच्या कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेला विख्यात शिक्षण तज्ञ | - | सदस्य |
| ३) संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण | - | सदस्य |
| ४) संबंधित विद्यापीठातील संबंधित विषयातील प्राध्यापक आणि विभाग प्रमुख | - | सदस्य |
| ५) संबंधित विषयातील विषय तज्ञ किंवा अधिष्ठाता | - | सदस्य |
| ६) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ७) संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव | - | सदस्य सचिव |

**क) महाविद्यालयातील अध्यापक पदासाठी आढावा समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) संबंधित विद्यापीठाचे प्र-कुलगुरु, किंवा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ | - | अध्यक्ष |
| २) विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण | - | सदस्य |
| ३) संबंधित विद्यापीठातील संबंधित विषयातील विभाग प्रमुख | - | सदस्य |
| ४) संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य | - | सदस्य |
| ५) कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेल्या संबंधित विषयातील विषय तज्ञ | - | सदस्य |
| ६) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ७) संबंधित विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक | - | सदस्य सचिव |

**ड) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाशी संलग्नित पदविका संस्थांमधील प्राचार्यांसाठी आढावा समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ | - | अध्यक्ष |
| २) संबंधित विभागीय सह संचालक, तंत्र शिक्षण | - | सदस्य |
| ३) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाशी संलग्नित संस्थातील प्राचार्य | - | सदस्य |
| ४) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ५) संबंधित कार्यालयाचे उप सचिव महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ | - | सदस्य सचिव |

**इ) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित संस्थातील अध्यापकांसाठी आढावा समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ | - | अध्यक्ष |
| २) संबंधित सह संचालक, विभागीय कार्यालय तंत्रशिक्षण | - | सदस्य |
| ३) संबंधित संस्थेचे प्राचार्य | - | सदस्य |
| ४) संबंधित विषयातील तज्ञ | - | सदस्य |
| ५) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ६) उप सचिव, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ | - | सदस्य सचिव |

३. तसेच मा. उच्च न्यायालयाने उक्त याचिकांच्या अनुषंगाने दि.३० सप्टेंबर, २०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालये / संस्था व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील अनुदानित अशासकीय संस्थांमधील प्राचार्य व अध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजाचा वार्षिक आढावा घेण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र (Mechanism) अस्तित्वात नसल्यामुळे उक्त शैक्षणिक संस्थेतील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेमध्ये मुदतवाढ देतांना त्यांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेण्याची गरज असून त्यासाठी योग्य ते कार्यतंत्र (Mechanism) निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे मत प्रदर्शित केले.

४. मा. उच्च न्यायालयाचे वरील मत विचारात घेऊन, शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(१) शासकीय महाविद्यालये व संस्थांमधील अध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी विहित कार्यतंत्र अस्तित्वात आहे. त्यामुळे **शासकीय महाविद्यालये / संस्थांमधील प्राचार्य / अध्यापक** यांना नियत वयोमनानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत मुदतवाढ देतांना संदर्भाधीन क्र.९ येथील दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ११ मधील तरतूदींची पूर्तता करणाऱ्या अध्यापक/प्राचार्यांचे प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण/ संचालक, तंत्रशिक्षण यांनी तपासून सेवानिवृत्तीपूर्वीच्या २ महिने अगोदर थेट शासनास सादर करावेत.

(२) अकृषि विद्यापीठे व अनुदानित अशासकीय महाविद्यालये व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील **अनुदानित अशासकीय संस्थेमधील प्राचार्य / अध्यापकांना** सेवानिवृत्तीच्या वयोमानात मुदतवाढ देतांना संदर्भाधीन क्र.९ येथील दि.५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.११ मधील नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात यावा :-

**अ) अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्था व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील अनुदानित संस्थेमधील प्राचार्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचा आढावा :-**

i) महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले किंवा कसे नसल्यास, त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले,

ii) महाविद्यालयाचे नॅक / एनबीए या संस्थेकडे मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे,

iii) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेबाबत मागील पाच वर्षांचा आलेख,

iv) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरु केले,

v) महाविद्यालयामध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या,

vi) महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विहित कार्यपध्दतीनुसार बिंदूनामावली तयार करण्यात आली आहे किंवा कसे,

vii) महाविद्यालयाविरुध्द चौकशी प्रलंबित आहे किंवा कसे,

viii) महाविद्यालयातील किती अध्यापकांना / विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी प्रोत्साहीत करण्यात आले,

ix) महाविद्यालयामार्फत राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले,

x) राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती कार्यशाळा / चर्चासत्रांना उपस्थित राहिले,

xi) महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रम राबविण्यात आले,

xii) महाविद्यालयास किती पारितोषिक मिळाली,

xiii) महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरुपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत,

xiv) महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी लॅबोरेटरीज, इंडस्ट्रीज, एन.जी.सी. व सामाजिक आणि शैक्षणिक संस्था व इतर यांच्यातील समन्वय Linkages साधण्यात आला आहे काय,

xv) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती टक्केवारी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे

एन.सी.सी. मधील योगदान कसे आहे, एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे, सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात,

xvi) महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते,

xvii) महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत कोणते नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात, अभ्यासक्रमात कमकुवत विद्यार्थ्यांसाठी कोणती विशेष योजना / प्रयत्न केले जातात,

xviii) महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे, सदर संकेतस्थळ अद्ययावत ठेवले आहे किंवा कसे,

xix) महाविद्यालयामार्फत रॅगिंग कायद्यानुसार सर्व उपाययोजना केल्या आहेत किंवा कसे,

xx) महाविद्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांमधून/स्त्रोतांमधून मिळालेल्या निधीचा त्याच प्रयोजनासाठी विनियोग केला जातो किंवा कसे,

xxi) महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.), जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) व इतर संस्थांकडून (शासकीय व अशासकीय) विविध योजनांकरिता किती अनुदान प्राप्त केले याचा तपशील,

xxii) महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छतेसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते,

xxiii) महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात,

xxiv) महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे,

xxv) प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकांच्या (guide) माध्यमातून विविध विषयातील किती संशोधक शिष्यवृत्तीधारक (Research Scholar) तयार केले,

xxvi) आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (International Peer Journal) मधून महाविद्यालयातील संशोधकांनी किती शोध निबंध प्रकाशित केले,

xxvii) एकूण किती संदर्भग्रंथ प्रकाशित करण्यात आले त्यापैकी किती संदर्भग्रंथांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे,

xxviii) आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयावरील परिषदांमध्ये / ऑलिपियाडमध्ये शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील किती अध्यापकांनी भाग घेतला आहे,

xxix) महाविद्यालयाकडून चालविण्यात येणाऱ्या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख आहेत.

**ब) अकृषि विद्यापीठातील अध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा :-**

i) विद्यापीठातील किती विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी प्रोत्साहीत / मार्गदर्शन करण्यात आले,

ii) विद्यापीठातील किती विद्यार्थ्यांना एम.फील. साठी प्रोत्साहीत / मार्गदर्शन करण्यात आले,

iii) संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरुपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत,
iv) किती संस्था / उद्योग / प्रकल्प यांना सल्ला विषयक सेवा (consultancy) दिली आहे,
v) किती संशोधन लेख (Research Article) प्रकाशित केले आहेत,
vi) महाविद्यालयामार्फत राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले,
vii) राज्य /राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती कार्यशाळा / चर्चासत्रांना उपस्थित राहिले,
viii) अध्यापन करीत असलेल्या विषयातील किती संदर्भग्रंथ प्रकाशित केले आहेत त्यापैकी किती संदर्भग्रंथांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे,
ix) अध्यापन करीत असलेल्या विषयाव्यतिरिक्त एकूण किती संदर्भग्रंथ प्रकाशित केले आहेत त्यापैकी किती संदर्भग्रंथांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे,
x) अध्यापक निवड प्रक्रिया त्याचप्रमाणे परिक्षा प्रक्रियेच्या अनुषंगाने किती ठिकाणी विषयतज्ञ म्हणून काम केले आहे,
xi) अध्यापन करीत असलेल्या विषयातील कोणकोणत्या प्राधिकरण / मंडळ / संस्था यावर सदस्य आहेत,
xii) अध्यापन करीत असलेल्या विषय व इतर उपक्रमांमध्ये किती पारितोषिके मिळाली आहेत,
xiii) राज्य / राष्ट्रीय स्तरावरील किती पुरस्कार प्राप्त झाले.

**(क) अशासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्था व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील अनुदानित अशासकीय संसथेमधील अध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा :-**

i) संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरुपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत,
ii) किती संशोधन लेख (Research Article) प्रकाशित केले आहेत,
iii) राज्य /राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती कार्यशाळा / चर्चासत्रांना उपस्थित राहिले,
iv) अध्यापन करीत असलेल्या विषयातील किती संदर्भग्रंथ प्रकाशित केले आहेत त्यापैकी किती संदर्भग्रंथांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे,
v) अध्यापन करीत असलेल्या विषयाव्यतिरिक्त एकूण किती संदर्भग्रंथ प्रकाशित केले आहेत त्यापैकी किती संदर्भग्रंथांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे,
vi) अध्यापन करीत असलेल्या विषयातील कोणकोणत्या प्राधिकरण / मंडळ / संस्था यावर सदस्य आहेत,
vii) अध्यापन करीत असलेल्या विषय व इतर उपक्रमांमध्ये किती पारितोषिके मिळाली आहेत,
viii) राज्य / राष्ट्रीय स्तरावरील किती पुरस्कार प्राप्त झाले.

५.	सर्व याचिकाकर्त्यांची प्रकरणे सदर आदेशातील निकषानुसार उक्त संबंधित आढावा समितीने तपासून सहा महिन्यांच्या आंत आवश्यक त्या शिफारशीसह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण यांच्यामार्फत शासनास सादर करावीत.

६.	वर नमूद आढावा समित्यांनी कार्यरत असलेल्या अध्यापक/प्राचार्य यांच्याबाबतीत सेवानिवृत्तीच्या ६ महिन्यापूर्वी छाननी करण्याची प्रक्रिया सुरु करावी व सेवानिवृत्तीस किमान ३ महिने शिल्लक असतांना मुदतवाढीस पात्र अध्यापक/प्राचार्यांचे प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण यांच्यामार्फत शासनास सादर करावेत.

७.	संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण यांनी विद्यापीठांकडून विहित वेळेत प्रस्ताव प्राप्त करुन प्रस्तावांची योग्य तपासणी करुन प्रस्ताव शासनास विहित कालमर्यादेत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

८.	प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे माहे, सप्टेंबर, २०११ ते माहे नोव्हेंबर, २०११ या तीन महिन्याच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांच्या संदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यामुळे या कालावधीतील अध्यापकांची प्रकरणे प्रस्तुत शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित आढावा समितीने तपासून पात्र अध्यापकांचे प्रस्ताव संचालकामार्फत शासनास त्वरीत सादर करावेत.

९.	ज्या अध्यापकांना यापूर्वी मुदतवाढ देण्यात आली आहे, त्यांना सदर शासन निर्णयातील तरतूदी लागू होणार नाहीत.

१०.	सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून अकृषी विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालय/संस्था प्राचार्य/अध्यापक यांचे वार्षिक गोपनीय अहवाल शासकीय महाविद्यालयातील प्राचार्य/अध्यापकांप्रमाणेच लिहण्यात यावेत व जतन करण्यात यावेत.

११.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत क्रमांक 201111230631051150001आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

स्वाक्षरी/-

**( विकास तु. कदम )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१	मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई
२	सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
३.	सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
४.	संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
५.	संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुबई
६.	महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई (५ प्रती)
७.	महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र मुंबई (५ प्रती )
८.	महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र , नागपूर (५ प्रती)
९.	महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र नागपूर (५ प्रती )

१०. संचालक, व लेखा व कोषागारे , (५ प्रती)
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी
१४. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्रशिक्षण
१५. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१६. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१७. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.
१८. निवड नस्ती-विशी - १.

~~C - 726~~

**विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/(३९६/११)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १ डिसेंबर, २०११.

वाचा :
१ ) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-यू.II/यू.I(i) दि.३१ डिसेंबर, २०
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.
३) केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.एफ.१-७/२०१०-यू.II, दिनांक ११ मे, २०१०.
४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम २०१०, क्र.एफ.३-१/२००९, दिनांक ३० जून, २०१०
५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र. ३७-३/लिगल/२०१०, दि. ५ मार्च २०१० (पदवी)
६) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र.३७-३/लिगल/२०१०, दि.५ मार्च २०१० (पदविका)
७) शासन निर्णय क्र. एस.पी.सी.-२०१०/(३४/१०)/ तां.शि.-२, दि. २० ऑगस्ट २०१०
८) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.२५ फेब्रुवारी, २०११.
९) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.५ मार्च, २०११.
१०) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २३ नोव्हेंबर, २०११

शुध्दीपत्रक :

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन अ.क्र. १० येथील दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये प्राचार्य / अध्यापकांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी एकूण पाच आढावा समित्या घटीत करण्यात आलेल्या आहेत. सदर पाचही आढावा समित्या मधील "**संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी - सदस्य** " हे शब्द याद्वारे **वगळण्यात** येत आहेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत क्रमांक 201112171104301230001 आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

स्वाक्षरी/-

**( विकास तु. कदम )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
१ मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई
२ सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
३. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
४. संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई (५ प्रती)

16

C-727

७. महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र मुंबई (५ प्रती )
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र , नागपूर (५ प्रती)
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र नागपूर (५ प्रती )
१०. संचालक, व लेखा व कोषागारे , (५ प्रती)
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी
१४. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्रशिक्षण
१५. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१६. मा राज्यमंत्री. उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१७. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.
१८. निवड नस्ती-विशी - १.

विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०११/(३९६/११)/विशि-१,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३ फेब्रुवारी, २०१२.

वाचा : १) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-यू.II/ यू.I(i)] दिनांक ३१ डिसेंबर, २००८

२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दि.१२ ऑगस्ट, २००९

३) केंद्र शासनाच्या मनुषबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.एफ-१-७/२०१०-यू.II, दिनांक ११ मे, २०१०

४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम २०१०, क्र.एफ-३-१/२००९, दि.३०जून,२०१०

५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसूचना क्र.३७-३/लिगल/२०१०, दि.५ मार्च,२०१० (पदवी)

६) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसूचना क्र.३७-३/लिगल/२०१०, दि.५ मार्च,२०१० (पदविका)

७) शासन निर्णय क्र.एस.पी.सी.२०१०/(३४/१०)/तांशि-२, दि.२० ऑगस्ट, २०१०

८) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/(५०३/१०)/विशि-१, दि.२५ फेब्रुवारी,२०११

९) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/(५०३/१०)/विशि-१, दि.५ मार्च,२०११

१०) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/(५०३/१०)/विशि-१, दि.२३ नोव्हेंबर,२०११

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या शिफारशी, तथा विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील अभ्यासक्रम राबविणारी अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ, अकृषि विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित तंत्र निकेतनातील अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय निर्धारित केल्याचे निकष व अनुषंगिक बाबींचा

साकल्याने विचार करुन संदर्भाधीन क्र.९ येथील दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापक व प्राचार्य पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

उक्त दिनांक ५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयाविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिकाक्रमांक - २०९३/२०११, ३१९७/२०११, ३४६३/२०११, ६२६२/२०११, ७१४३/२०११, ७७५६/२०११, ९५१/२०११, ९५३/२०११ याचिका लॉजिंग क्रमांक - १४०९/२०११, १४२६/२०११ व १४९७/२०११ दाखल झाल्या होत्या. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.३० सप्टेंबर, २०११ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.३० सप्टेंबर, २०११ रोजी दिलेल्या आदेशातील खालील मुद्दयांवर शासन आदेश निर्गमित करण्यात आलेले नव्हते.

२. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील परिच्छेद - ३० मध्ये - (I) In the premises, we hold that clauses 11(1), 11(3) and 11(4) of the GR dated 5th March 2011 do not suffer from any infirmities / unconstitutionality and hence the challenge to the validity of the said clauses is hereby rejected. However, we direct, by way of exception, for the limited up to 31st March 2014, to place the cases of the Assistant Professors who do not possess a Ph.D. degree but have received the benefits of the Career Advancement Scheme, before the Performance Review Committee and the said committee shall assess their performance as per the parameters set out for deciding their retention beyond the age of 60 years.

(II) We also direct that the performance review of the college / University teachers and Principals who have retired during the intervening period i.e. from 28th February, 2011 onwards be completed as expeditiously as possible and in any case within a period of six weeks from the issuance of the revised notification. The Principals / Lecturers / Professors who are found to be fit for being continued till the age of 62 years or 65 years as the case may be, shall be entitled for the payment of salary for the intervening period.

(III) 'Indeed such parameters suggested could be only illustrative and not exhaustive. Nonetheless, emphasis of such exercise to review the performance during the last five years ought to

be on academic achievements and free from personal bias, unfairness and arbitrariness.

३. उक्त मुद्दयाच्या अनुषंगाने शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक**

४. प्रस्तावनेत नमूद केलेल्या सर्व बाबी व मा.उच्च न्यायालयाचे दि.३० सप्टेंबर, २०११ रोजीचे आदेश विचारात घेऊन,शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे :-

(१ ) विशेष अपवाद (exception) म्हणून दिनांक ३१ मार्च, २०१४ या कालमर्यादे पर्यंत ज्या सहायक प्राध्यापकांनी पी.एचडी. पदवी धारण केलेली नाही. परंतु, करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत फायदे देण्यासाठी त्यांना शासनाने मान्यता दिलेली आहे, अशा सहायक प्राध्यापकांची प्रकरणे संदर्भाधीन क्रमांक - १० येथील दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये घटीत केलेल्या आढावा समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(२) आढावा समितीने अशा सहायक प्राध्यापकांची / अध्यापकांची प्रकरणे संदर्भाधीन क्रमांक - ९ येथील दिनांक ५ मार्च, २०११ व संदर्भाधीन क्रमांक - १० येथील दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयामधील पी.एचडी. व वार्षिक गोपनीय अहवालाची अट वगळता विहीत केलेल्या इतर सर्व बाबी विचारात घेऊन तपासावीत.

(३) जे सहाय्यक प्राध्यापक/ अध्यापक / प्राचार्य माहे फेब्रुवारी, २०११ व त्यानंतर सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांचे प्रस्ताव सुध्दा आढावा समितीने सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार तपासावीत.

(४) दि.१एप्रिल,२०१४ पासून संदर्भाधीन क्रमांक - ९ येथील दि.५ मार्च,२०११ च्या शासन निर्णयातील सर्व बाबींची पूर्तता करणे अनिवार्य राहील. तसेच संदर्भाधीन क्रमांक - १० येथील दि.२३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे यापुढेही अंमलात राहतील.

५. संदर्भाधीन क्रमांक - १० येथील दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयामध्ये खालील प्रमाणे अल्पशी सुधारणा करण्यात येत आहे.

(१) **परिच्छेद क्रमांक - ४(ब) (v) ऐवजी** "संबंधित अध्यापकाने चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळामध्ये किती संशोधन लेख (Research paper) सादर केले आहेत".

(२) **परिच्छेद क्रमांक - ४(ब) (vi) ऐवजी** "विद्यापीठामार्फत राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळाच्या आयोजन समितीमध्ये सहभाग घेतलेला आहे".

(३) **परिच्छेद क्रमांक - ४(ब) (viii) व (ix)** मधील **"संदर्भग्रंथ"** या शब्दानंतर **"/संपादित ग्रंथ"** या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे.

(४) **परिच्छेद क्रमांक - ४(ख) (xii) व (xiii) ऐवजी** "संबंधित अध्यापकाने राज्य / राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमामध्ये किती पारितोषिक / पुरस्कार / प्रशस्तीपत्र प्राप्त केले आहेत".

(५) **परिच्छेद क्रमांक - ४(क) (ii) ऐवजी** "विभागीय / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळामध्ये किती संशोधनपर लेख (Research paper) सादर केले आहेत."

(६) **परिच्छेद क्रमांक - ४(क) (vii) व (viii) ऐवजी** "संबंधित अध्यापकाने विभागीय राज्य / राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये किती पारितोषिक / पुरस्कार / प्रशस्तीपत्र प्राप्त केली आहेत".

(७) ) **परिच्छेद क्रमांक - ४(क) (iv) व (v)** मधील "**संदर्भग्रंथ**" या शब्दानंतर "**/क्रमिक पुस्तके**" या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे.

६. वरील आदेश विचारात घेऊन आढावा समितीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकरणे तपासून पात्र सहाय्यक प्राध्यापकांचे / अध्यापकांचे / प्राचार्यांचे प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत शासनास त्वरीत सादर करावेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक - २०१२०२१८०७३१२८२२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( राजाराम जाधव )
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई

२. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव
४. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१, मुंबई ( ५ प्रती)
७. महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई ( ५ प्रती)
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -२, नागपूर ( ५ प्रती)
९. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र -२, नागपूर ( ५ प्रती)

E-728

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

Web: www.dhepune.gov.in E-mail- dhepune@yahoo.co.in

फोन नंबर- ०२०/ २६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नंबर- ०२०/२६१११११५३

क्रमांक- युएनआय/वयोमर्यादा वाढ/नावि/विशि-१ दिनांक- ३० डिसेंबर, २०११

फॅक्सद्वारे

प्रति,

१ कुलसचिव
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य

२ परीक्षा नियंत्रक,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

विषय-विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ- शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०११/(३९६/११)/विशि-१ दिनांक २३ नोव्हेंबर, २०११

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय शासन निर्णयाचे कृपया अवलोकन करावे.

वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार कळविण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठ व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक यांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सदर शासन निर्णयामध्ये प्राचार्य पदासाठी जी आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे, त्या समितीमध्ये अध्यक्ष हे संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु व सदस्य सचिव म्हणून कुलसचिव हे काम पाहतील. तसेच अकृषि विद्यापीठातील अध्यापकांच्याबाबत जी आढावा समिती स्थापन केलेली आहे त्यामध्ये संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु हे अध्यक्ष व सदस्य सचिव म्हणून कुलसचिव हे काम पाहतील. तसेच

(22)

~~C-729~~

[illegible]विद्यालयातील अध्यापक पदासाठी जी आढावा समिति स्थापन केलेली आहे, त्यामध्ये संबंधित विद्यापीठाचे प्र-कुलगुरु किंवा संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ हे अध्यक्ष तसेच परीक्षा [illegible] हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील असे नमूद केलेले आहे. तसेच सदरचे प्रस्ताव हे संचालनालयामार्फत शासनास सादर करावेत असे नमूद केलेले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे आपण सदर आढावा समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून काम करणार आहात. त्यानुसार सदर समितीची बैठक बोलाविणे, व त्यानुसार बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रस्ताव तपासून त्यावर आपल्या समितीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून तसेच संबंधित महिनावार प्रस्ताव स्वतंत्रपणे दोन प्रतीत या संचालनालयामार्फत शासनास पाठविणे आवश्यक आहे.

संबंधित शासन निर्णय निर्गमित होऊन जवळपास बराच कालावधी लोटला आहे. तसेच माहे सप्टेंबर- २०११ ते डिसेंबर-२०११ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अधिव्याख्यात्यांचे प्रस्ताव हे वर नमूद केलेल्या समितीने तपासून संचालनालयामार्फत शासनास सादर करावेत असे नमूद केलेले आहे. याबाबत कोणत्याच विद्यापीठाचे प्रस्ताव या संचालनालयास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे आपल्या विद्यापीठामार्फत [illegible] व कार्यपध्दती ठरवून त्या अनुषंगाने विहित मुदतीत तातडीने बैठका घेऊन शासन निर्णयात नमूद केलेल्या मुद्दयानुसार कार्यवाही करुन तसे प्रस्ताव आपल्या समितीच्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह या संचालनालयास महिनावार दोन प्रतीत सादर करावेत. याबाबत सदरचे प्रस्ताव वेळेवर प्राप्त न झाल्यास व याप्रकरणी काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास ही जबाबदारी सुधारित शासन निर्णयाव्दारा विहित समिति ही विद्यापीठाची असल्याने त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या विद्यापीठाची राहील याची नोंद घ्यावी.

३०/१२/२०११

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

007

**राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील संचालक, उप संचालक व सहायक संचालक, शारिरीक शिक्षण या शिक्षक समकक्ष पदांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६२ वर्षे करण्याबाबत.........**

**महाराष्ट्र शासन,**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०११/(३७०/११)-विशि-१,

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक : २८ मार्च, २०१२.

**वाचाः** १) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-यू.II/यू.I(i) दि.३१ डिसेंबर, २००८

२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.

३) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.एफ.1-२२/९७-यु.आय., दिनांक २७ जुलै, १९९८.

४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.एफ.1-२२/९७-यु.आय., दिनांक ६ नोव्हेंबर, १९९८.

५) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.एफ.नं.1-९/९९-यु.ई., दिनांक २२ सप्टेंबर, २००६.

६) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.एफ.३-१-९४ (पीएस)-७, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.

७) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.एफ.३-१/९४ (पीएस)-७, दिनांक ३ मार्च, २००७.

८) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.५ मार्च, २०११.

७) शासन निर्णय क्र. एस.पी.सी.-२०१०/(३४/१०)/ तां.शि.-२, दि. २० ऑगस्ट २०१०

९) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.२३ नोव्हेंबर, २०११.

१०) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)-विशि-१, दि.२३ फेब्रुवारी, २०१२.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालये तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील पात्र अध्यापकांची कमतरता आणि विद्यापीठ अनुदान आयोग व ए.आय.सी.टी.ई. यांनी अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेमध्ये केलेली वाढ विचारात घेऊन राज्य शासनाने अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालये तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील पात्र अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वर्षे करण्याचा निर्णय घेतला असून यासंदर्भात दि.५ मार्च, २०११, दि. २३ नोव्हेंबर, २०११ व दि.२३ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयांन्वये आवश्यक ते आदेश

निर्गमित केलेले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये संचालक, उप संचालक व सहायक संचालक, शारिरीक शिक्षण या पदांचा समावेश करण्यात आलेला नाही.

२. सदर पदाच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६२ करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग व केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने यापूर्वीच दि.२७ जुलै, १९९८, ६ नोव्हेंबर, १९९८, २२ सप्टेंबर, २००६, १९ ऑक्टोबर, २००६ आणि मार्च, २००७ च्या पत्रांन्वये कळविले आहे. त्यामुळे सदर शिक्षक समकक्ष पदांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६२ वर्षे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र.३,४,५,६ व ७ येथील पत्रांन्वये दिलेले आदेश विचारात घेता याद्वारे राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील संचालक, उप संचालक व सहायक संचालक, शारिरीक शिक्षण या शिक्षक समकक्ष पदांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वयोमान ६० वर्षावरुन ६२ वर्षे करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मंजूरी देत आहे :-

(i) अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या संदर्भाधीन क्र.८, ९ व १० येथील अनुक्रमे दिनांक ०५/०३/२०११, २३/११/२०११ व २३/०२/२०१२ च्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी या पदांना जशाच्यांतशा लागू राहतील.

(ii) शासनाद्वारे, सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत जी मार्गदर्शक तत्वे / आदेश वेळोवेळी निश्चित करण्यात येतील, ती सर्व मार्गदर्शक तत्वे / आदेश या पदास जसेच्यातसे लागू राहतील.

(iii) सदर शासन निर्णयातील तरतूदी फेब्रुवारी, २०११ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

(iv) माहे फेब्रुवारी, २०११ पासून सेवानिवृत्त झालेल्या संचालक, उप संचालक व सहायक संचालक, शारिरीक शिक्षण यांचे प्रस्ताव संबंधित संस्थेने विद्यापीठाकडे त्वरीत पाठवावेत. आढावा समितीने दि.५ मार्च, २०११, २३/११/२०११ व २३/०२/२०१२ च्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे प्रस्तावांची छाननी करुन आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह आवश्यक ते प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत सादर करावेत.

(v) सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी जे संचालक, उप संचालक व सहायक संचालक, शारिरीक शिक्षण सेवानिवृत्त झालेले आहेत, अशा अध्यापकांना मुदतवाढ देतांना त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक व त्यांना प्रत्यक्ष मुदतवाढ देण्यात आल्यानंतर ते कर्तव्यावर रुजू झाल्याचा दिनांक या दरम्यानचा कालावधी हा प्रत्यक्ष कर्तव्य कालावधी असणार नाही. त्यामुळे सदर कालावधीतील कोणतेही वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

(vi) तथापि, उक्त कालावधी हा सेवाखंड न धरता सदर कालावधी सेवानिवृत्ती वेतनाच्या प्रयोजनार्थ वेतनार्ह सेवा ग्राह्य धरण्यात येईल.

(vii) ज्या संचालक, उप संचालक व सहायक संचालक, शारिरीक शिक्षण यांनी यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, संबंधित याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यास त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून वेतन अनुज्ञेय करण्याचा निर्णय दिला असल्यास त्या प्रकरणात संबंधित याचिकाकर्त्यास सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून वेतन अनुज्ञेय राहील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. **201203281300543540001** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नांवाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई
२ सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
३. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
४. संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई (५ प्रती)
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र मुंबई (५ प्रती )
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र , नागपूर (५ प्रती)
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र नागपूर (५ प्रती )
१०. संचालक, व लेखा व कोषागारे , (५ प्रती)
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी
१४. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्रशिक्षण
१५. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१६. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१७. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.
१८. निवड नस्ती-विशि - १.